**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

**परकीय भाषा विभाग**

**परकीय भाषा विभाग सन २०२४-२५ करिता खालील परकीय भाषांचे**

**अर्धवेळ अभ्यासक्रम जाहीर करत आहे.**

***फ्रेंच, जर्मन, जपानी, स्पॅनिश भाषांचे***

**पायाभूत जलद गती अभ्यासक्रम**

[Foundation Course Fast track Levels 1 & 2]

**पायाभूत अभ्यासक्रम - जलद गती – प्रथम स्तर** (पूर्वीचा इन्टेन्सिव्ह सर्टिफिकेट कोर्स) : ***फ्रेंच, जर्मन, जपानी व स्पॅनिश***

**पायाभूत अभ्यासक्रम - जलद गती – द्वितीय स्तर** (पूर्वीचा इन्टेन्सिव्ह डिप्लोमा कोर्स) : ***फ्रेंच व जर्मन***

**कालावधी :**

साडेचार महिने महिने (१८० तास) ६ जानेवारी २०२५ ते ९ मे २०२५

आठवड्यातून ५ दिवस, रोज २ तास

परीक्षा मे २०२५ मध्ये होईल. ती मात्र ऑनलाइन होणार नाही, सर्वांनाच परीक्षेसाठी परीक्षा केंद्रावर यावे लागेल.

**तुकड्या** :

- या वर्षी अभ्यासक्रमांच्या काही तुकड्या परकीय भाषा विभाग, पुणे ४ येथे नेहमीप्रमाणे प्रत्यक्ष वर्गात भरतील, तर काही तुकड्यांना ऑनलाइन पद्धतीने शिकवले जाईल. ऑनलाइन पद्धतीसाठी अर्थातच आवश्यक ती आंतरजालीय जोडणी तुमच्याकडे असणे अपेक्षित आहे. कॅमेरा व स्पीकरसह लॅपटॉप / डेस्कटॉप. कॅमेरा कायम चालू ठेवणे गरजेचे.
- गुणवत्ता याद्या शैक्षणिक गुणवत्तेनुसार तसेच सामाजिक आरक्षणाचे सर्व नियम पाळून तयार होतील.
- अर्ज भरताना बॅचेसचे दोन प्राधान्यक्रम द्यायचे असतात. शक्यतोवर तुमच्या पहिल्या, जागा भरल्यास दुसऱ्या पसंतीची बॅच द्यायचा आमचा प्रयत्न असतो.
- नव्याने एखादी भाषा शिकू इच्छिणाऱ्यांनी म्हणजे Level 1 अभ्यासक्रमांसाठी अर्ज भरताना पर्यायी भाषेची पसंती निवडून ठेवायची असते. जर जागा संपल्याने तुमचे नाव गुणवत्ता यादीत येऊ शकले नाही तर तुम्हाला

पर्यायी भाषेबाबत इमेल पाठवून पुन्हा एकदा तुमची संमती घेऊन त्या दुसऱ्या भाषेसाठी तुम्हाला प्रवेश देण्यात येईल. अशा वेळी नव्याने वेगळे प्रवेश शुल्क आकारले जात नाही.

**वि.सू.** : जर तुम्ही एक पूर्णवेळ आणि एक अर्धवेळ (जलदगतीने नव्हे, आठवड्यातून ६ तास होणारा) अशा दोन अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेला असेल तर तुम्हाला या जलदगती अभ्यासक्रमांना प्रवेश घेता येणार नाही. फ्रेंच किंवा जर्मनच्या पहिल्या जलदगती अभ्यासक्रमाचे (Fast Track Level 1 ) विद्यार्थी पुढच्या (Fast Track Level 2)साठी अर्ज करू शकतात.

**शैक्षणिक अर्हता**

- नव्याने शिकणाऱ्यांसाठी – Fast Track Level 1 : भारतातील कोणत्याही परीक्षा मंडळाची इयत्ता दहावी उत्तीर्ण
- Fast Track Level 2 : सा.फु.पु.वि.ची त्या भाषेची प्रमाणपत्र किंवा जलद प्रमाणपत्र किंवा Fast Track Level 1 परीक्षा उत्तीर्ण. सध्या Fast Track Level 1 करत असलेल्यांनी Fast Track Level 2साठी अर्ज भरताना appeared हा पर्याय निवडावा.
- जर Level 2 साठी समकक्ष अर्हतेच्या जोरावर अर्ज केला असेल तर अशांना प्रवेश परीक्षा द्यावी लागू शकते. त्याबाबत त्यांना स्वतंत्रपणे कळवले जाईल. मात्र अर्ज सर्वांनीच विहित वेळेत भरायचा आहे.
- LEVEL 2साठी समकक्ष अर्हता त्या त्या भाषेअंतर्गत पाहून घ्यावी.
- **LEVEL 2साठी अर्ज भरताना ज्या अर्हतेच्या बळावर तुम्ही अर्ज करू इच्छिता ती अर्हता सर्वसाधारण माहिती विभागातील मागील पदवी/पदविका अंतर्गत भरावी. म्हणजे मग त्या विवक्षित अभ्यासक्रमासाठी निवडायला ती अर्हता उपलब्ध होईल.**

कोणत्याही महाविद्यालयात अथवा सा.फु.पु.वि.च्या एखाद्या शैक्षणिक विभागात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना सदर अभ्यासक्रम पूर्ण केल्यास जास्तीचे १२ श्रेयांक (CREDITS) मिळतील.

**प्रवेशाचे वेळापत्रक**

| | **पासून** | **पर्यंत** |
|---|---|---|
| सा.फु.पु.वि.च्या CCEP वर अर्ज करता येईल (विलंब शुल्क न भरता) | **५ नोव्हेंबर २०२४** | **५ डिसेंबर २०२४** |
| (विलंब शुल्कासह) | **६ डिसेंबर २०२४** | **१५ डिसेंबर २०२४** |
| पहिली गुणवत्ता यादी | **२० डिसेंबर २०२४ (सायंकाळी ६)** | |
| पहिल्या यादीत नाव लागलेल्यांनी शैक्षणिक व इतर शुल्क भरून प्रवेश निश्चित करणे | **२० डिसेंबर २०२४** | **२५ डिसेंबर २०२४** |
| दुसरी गुणवत्ता यादी | **२७ डिसेंबर २०२४** | |
| दुसऱ्या यादीत नाव लागलेल्यांनी शैक्षणिक व इतर शुल्क भरून प्रवेश निश्चित करणे | **२७ डिसेंबर २०२४** | **३० डिसेंबर २०२४** |
| तिसरी गुणवत्ता यादी (आवश्यकता असल्यास) | **२ जानेवारी २०२५** | |
| तिसऱ्या यादीत नाव लागलेल्यांनी शैक्षणिक व इतर शुल्क भरून प्रवेश निश्चित करणे | **२ जानेवारी २०२५** | **४ जानेवारी २०२५** |

पर्यायी भाषेच्या पसंतीबाबतची प्रवेशप्रक्रिया ४ जानेवारीनंतर, तिसऱ्या यादीतही नाव लागू न शकलेले कोणी असल्यास राबविण्यात येईल.

शैक्षणिक व इतर शुल्क सर्व भाषांच्या त्या त्या इयत्तेला समान शुल्क असेल.

१. प्रवेश अर्ज शुल्क : खुला गट Rs 600/- आरक्षित गट Rs 400/- प्रत्येक अभ्यासक्रमासाठी. पुढे प्रवेश न घेतल्यास परतावा मिळणार नाही. विलंब शुल्क अनुक्रमे Rs 750/- Rs 550/-
२. एकापेक्षा अधिक भाषांना स्वतंत्र फी चलन तयार करून, तसे पैसे भरून अर्ज करणे शक्य हे. तुमचे नाव एकापेक्षा अधिक भाषांच्या यादीत लागले तरी प्रवेश मात्र एकाच भाषेचे शुल्क भरून घेता येईल. इतर भाषांच्या प्रवेश अर्जांच्या शुल्काचा परतावा मिळणार नाही.
३. शैक्षणिक व इतर शुल्क :

   वि. सू. : **हे अर्धवेळ अभ्यासक्रम आहेत. त्यामुळे कोणत्याही प्रवर्गाला कसलीही शुल्क सवलत लागू असणार नाही.**

| New Name | Foundation Course Fast Track Level 1 | Foundation Course Fast Track Level 2 |
|---|---|---|
| Old Name | Intensive Certificate | Intensive Diploma |
| Tuition fee | 6500 | 9035 |
| Student Welfare | 120 | 120 |
| Development Fee | 125 | 125 |
| Disaster Management Fund | 20 | 20 |
| Computerization Fee | 100 | 100 |
| Registration Fee | 75 | 75 |
| Student Safety Insurance | 20 | 20 |
| Admission Fee | 50 | 50 |
| Student AID Fund | 10 | 10 |
| Extra-Curricular Activities | 1000 | 1000 |
| Corpus Fund | 4 | 4 |
| I card Fee | 120 | 120 |
| **Total Fees** | **8144** | **10679** |

महाराष्ट्र अधिवास नसलेल्यांसाठी शैक्षणिक शुल्क दुप्पट आहे, बाकी सर्व शुल्क समान राहील. अ-भारतीयांना शैक्षणिक शुल्क तिप्पट आहे, बाकी सर्व शुल्क समान राहील.

## भाषावार शैक्षणिक अर्हता व तुकड्या

**वि. सू. : सामाजिक आरक्षण लागू केल्यानंतर -**

(i) Fast Track Level 2च्या ७० टक्के जागा मूलभूत अर्हताधारकांसाठी तर समकक्ष अर्हताधारकांसाठी ३० टक्के जागा राखीव.

(ii) कृपया आपले **नेमके गुण** लिहावेत, गुणवत्ता यादी त्यावर आधारित असेल. केवळ श्रेणी लिहिणे गुणवत्ता यादी करण्यासाठी पुरेसे नाही.

(iii) Fast Track Level 2**चे जे उमेदवार इतरत्र शिकून समकक्ष अर्हतेनुसार प्रवेश घेऊ इच्छितात त्यांना प्रवेश परीक्षा द्यावी लागेल. ती ऑफलाइन पद्धतीनेही होऊ शकेल. तपशील स्वतंत्रपणे त्या त्या उमेदवारांना कळवला जाईल.**

### जपानी भाषेसाठी शैक्षणिक अर्हता

| | |
|---|---|
| **जपानी भाषेचा पायाभूत जलदगती अभ्यासक्रम – प्रथम स्तर** | **मूलभूत अर्हता :** SSC [कोणत्याही राज्य सरकारी / केंद्रीय परीक्षा मंडळाची इयत्ता दहावीची परीक्षा उत्तीर्ण] |

| २०२४-२५साठी जपानी भाषेच्या तुकड्या | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| तुकडी | वार | प्रहर | वेळ | केंद्र | विद्यार्थी संख्या |
| जपानी भाषेचा पायाभूत जलदगती अभ्यासक्रम – प्रथम स्तर (पूर्वीचा जलदगती प्रमाणपत्र अभ्यासक्रम) (एकूण 50 जागा) | | | | | |
| J I C 2 | सोमवार ते शुक्रवार | सकाळ | 7.30 ते 9.30 | परकीय भाषा विभाग, पुणे ४ | 50 |
| J I C 3 | सोमवार ते शुक्रवार | सायंकाळ | 6:30 ते 8:30 | तंत्रज्ञान विभाग, विद्यापीठ आवार, पुणे ७ | 50 |

### स्पॅनिश भाषेसाठी शैक्षणिक अर्हता

| | |
|---|---|
| **स्पॅनिश भाषेचा पायाभूत जलदगती अभ्यासक्रम – प्रथम स्तर** | **मूलभूत अर्हता :** SSC [कोणत्याही राज्य सरकारी / केंद्रीय परीक्षा मंडळाची इयत्ता दहावीची परीक्षा उत्तीर्ण] |

| २०२४-२५साठी स्पॅनिश भाषेच्या तुकड्या | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| तुकडी | वार | प्रहर | वेळ | केंद्र | विद्यार्थी संख्या |
| स्पॅनिश भाषेचा पायाभूत जलदगती अभ्यासक्रम – प्रथम स्तर (पूर्वीचा जलदगती प्रमाणपत्र अभ्यासक्रम) (एकूण 50 जागा) | | | | | |
| S I C 2 | सोमवार ते शुक्रवार | सायंकाळ | 6:30 ते 8:30 | Online | 50 |

## फ्रेंच भाषेसाठी शैक्षणिक अर्हता

| | |
|---|---|
| **फ्रेंच भाषेचा पायाभूत जलदगती अभ्यासक्रम – प्रथम स्तर** | **मूलभूत अर्हता :** SSC [कोणत्याही राज्य सरकारी / केंद्रीय परीक्षा मंडळाची इयत्ता दहावीची परीक्षा उत्तीर्ण] |
| **फ्रेंच भाषेचा पायाभूत जलदगती अभ्यासक्रम – द्वितीय स्तर**<br>SSC +<br>(१ ते ६ पैकी काहीही एक) | **मूलभूत अर्हता :** (७० टक्के जागा)<br>१. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची फ्रेंच भाषेच्या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची परीक्षा उत्तीर्ण.<br>२. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची फ्रेंच भाषेच्या जलद प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची परीक्षा उत्तीर्ण.<br>३. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची Foundation Course – Fast Track - in French Level 1 अभ्यासक्रमाची परीक्षा उत्तीर्ण. |
| | Equivalent Qualification :(30% seats)<br>**समकक्ष अर्हता :** (३० टक्के जागा) खालीलपैकी कोणतेही एक -<br>४. **DELF A1** ही Common European Framework of Reference for Languages (French) परीक्षा **उत्तीर्ण** (केवळ अभ्यासक्रम पूर्ण प्रमाणपत्र, स्थानिक Alliance Française किंवा इतर कोणा संस्थेच्या परीक्षेचे प्रमाणपत्र ग्राह्य नाही.)<br>५. FYBA ला फ्रेंच हा एक विषय, त्यात किमान ७० टक्के गुण.<br>3. BA ला फ्रेंच हा मुख्य विषय, त्यात किमान ६० टक्के गुण. |

| २०२४-२५साठी फ्रेंच भाषेच्या तुकड्या | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **तुकडी** | **वार** | **प्रहर** | **वेळ** | **केंद्र** | **विद्यार्थी संख्या** |
| **फ्रेंच भाषेचा पायाभूत जलदगती अभ्यासक्रम – प्रथम स्तर (पूर्वीचा जलदगती प्रमाणपत्र अभ्यासक्रम) (एकूण 120 जागा)** | | | | | |
| F I C 4 | सोमवार ते शुक्रवार | सकाळ | 8:30 ते 10:30 | Online | 40 |
| F I C 5 | सोमवार ते शुक्रवार | दुपार | 4 ते 6 | परकीय भाषा विभाग | 40 |
| F I C 6 | सोमवार ते शुक्रवार | सायंकाळ | 6:30 ते 8:30 | Online | 40 |
| **फ्रेंच भाषेचा पायाभूत जलदगती अभ्यासक्रम – द्वितीय स्तर (पूर्वीचा जलदगती पदविका अभ्यासक्रम) (एकूण 80 जागा)** | | | | | |
| FID 3 | सोमवार ते शुक्रवार | सकाळ | 8:30 ते 10:30 | Online | 40 |
| FID 4 | सोमवार ते शुक्रवार | सायंकाळ | 6:30 ते 8:30 | Online | 40 |

## जर्मन भाषेसाठी शैक्षणिक अर्हता

| | |
|---|---|
| **जर्मन भाषेचा पायाभूत जलदगती अभ्यासक्रम – प्रथम स्तर** | **मूलभूत अर्हता :** SSC [कोणत्याही राज्य सरकारी / केंद्रीय परीक्षा मंडळाची इयत्ता दहावीची परीक्षा उत्तीर्ण] |
| **जर्मन भाषेचा पायाभूत जलदगती अभ्यासक्रम – द्वितीय स्तर**<br>**१ ते ७ पैकी काहीही एक** | **मूलभूत अर्हता :**(७० टक्के जागा) खालीलपैकी कोणतेही एक –<br>१. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची जर्मन भाषेच्या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची परीक्षा उत्तीर्ण.<br>२. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची जर्मन भाषेच्या जलद प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची परीक्षा उत्तीर्ण.<br>३. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची Foundation Course – Fast Track - in German Level 1 अभ्यासक्रमाची परीक्षा उत्तीर्ण. |
| | **समकक्ष अर्हता :** (३० टक्के जागा) खालीलपैकी कोणतेही एक –<br>४. बारावीला जर्मन भाषेत १०० गुणांच्या परीक्षेत किमान ७० गुण पडून परीक्षा उत्तीर्ण.<br>५. कला / वाणिज्य विद्याशाखेच्या प्रथम वर्षात जर्मन भाषेत नवशिक्या किंवा प्रगत स्तरावर किमान ७० टक्के गुण.<br>६. मान्यताप्राप्त संस्थेत जर्मन भाषेचे १८० तासांचे शिक्षण, त्याची परीक्षा किमान ८० टक्के गुणांनी उत्तीर्ण.<br>७. GI / MMB ची A2 स्तराची परीक्षा किमान ८० टक्के गुणांनी उत्तीर्ण ('Gut' श्रेणी). |

| **२०२४-२५साठी जर्मन भाषेच्या तुकड्या** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **तुकडी** | **वार** | **प्रहर** | **वेळ** | **केंद्र** | **विद्यार्थी संख्या** |
| **जर्मन भाषेचा पायाभूत जलदगती अभ्यासक्रम – प्रथम स्तर (पूर्वीचा जलदगती प्रमाणपत्र अभ्यासक्रम) (एकूण 250 जागा)** | | | | | |
| G I C 6 | सोमवार ते शुक्रवार | सकाळ | 8:30 ते 10:30 | Online | 50 |
| G I C 7 | सोमवार ते शुक्रवार | दुपार | 4 ते 6 | परकीय भाषा विभाग, पुणे ४ | 50 |
| G I C 8 | सोमवार ते शुक्रवार | सायंकाळ | 6:30 ते 8:30 | परकीय भाषा विभाग, पुणे ४ | 50 |
| G I C 9 | सोमवार ते शुक्रवार | सायंकाळ | 6:30 ते 8:30 | Online | 50 |
| G I C 10 | सोमवार ते शुक्रवार | सायंकाळ | 6:30 ते 8:30 | भौतिक शास्त्र विभाग, विद्यापीठ आवार, पुणे ७ | 50 |
| **जर्मन भाषेचा पायाभूत जलदगती अभ्यासक्रम – द्वितीय स्तर (पूर्वीचा जलदगती पदविका अभ्यासक्रम) (एकूण 100 जागा)** | | | | | |
| GID 3 | सोमवार ते शुक्रवार | सकाळ | 8.30 ते 10.30 | Online | 50 |
| GID 4 | सोमवार ते शुक्रवार | सायंकाळ | 6.30 ते 8.30 | परकीय भाषा विभाग | 50 |

## सूचना

**सर्व प्रवेश गुणवत्तेनुसार तसेच सामाजिक आरक्षणाचे नियम पाळून होतील.**

**प्रवेशाची प्रक्रिया -**

1. प्रथम https://campus.unipune.ac.in/CCEP/Login.aspx या संकेतस्थळावर जा.
2. CCEP वर तपशीलवार User Manual आहे. ते वाचा व तुमचे खाते नसेल तर आधी निर्माण करा.
3. जर तुम्ही गेल्या वर्षी परकीय भाषेच्या एखाद्या अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला असेल किंवा गेल्या किंवा या वर्षी दुस-या अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यासाठी खाते उघडले असेल तर त्याच नावाने पुन्हा त्यात प्रवेश करा (Log in).
4. सुरुवातीला वैयक्तिक माहितीचा भाग विद्यापीठाच्या सर्वच पूर्णवेळ / अर्धवेळ अभ्यासक्रमांना समान असतो. तेथे तुम्ही आवश्यक शैक्षणिक अर्हतेच्या अभ्यासक्रमाचा उल्लेख करून ठेवलेला असला पाहिजे. मग विशिष्ट अभ्यासक्रमासाठी अर्ज भरताना शैक्षणिक अर्हतेचा तो पर्याय तुम्हाला निवडीसाठी उपलब्ध होईल.
5. सर्व प्राथमिक माहिती नोंदवल्यानंतर विशिष्ट अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यासाठी Apply for Course यावर टिचकी मारावी. तुम्हाला काही पर्याय दिसतील. त्यातील ALL किंवा Humanities निवडा. तेथे वरती Foundation Courses in Foreign Languages हा मजकूर दिसेल. त्याच्या शेजारचे बटन निवडा. एवढे केल्यावर तुम्हाला परकीय भाषा विभागाचे सर्व अभ्यासक्रम दिसू शकतील. तुम्हाला पाहिजे तो अभ्यासक्रम निवडा.
6. अर्जाचे शुल्क भरेपर्यंत तुम्हाला तुमच्या अर्जातील तपशील बदलता येईल. एकदा अर्जाचे शुल्क भरले की अर्जात कोणताही बदल करता येणार नाही तसेच त्याच अभ्यासक्मासाठी आणखी एक अर्जही भरता येणार नाही.
7. अर्जाचे शुल्क ऑनलाइन भरायचे आहे. त्यानंतर तुम्हाला print हा पर्याय दिसेल. अर्ज आपल्या संगणकावर उतरवून ठेवा व छापून ठेवा. अर्जाची तीन पाने असतील. अर्ज, कबुलीनामा, व पैसे मिळाल्याची पोच - अशी एकूण ३ पाने असतील. पोचपावतीवर तुमचा अर्ज क्रमांकही असेल.
8. नव्याने एखादी भाषा शिकू इच्छिणा-यांनो, तुम्ही एकापेक्षा अधिक भाषांच्या अभ्यासक्रमांसाठी अर्ज करून ठेवू इच्छित असल्यास प्रत्येक अभ्यासक्रमासाठी नव्याने चलन निर्माण करून प्रत्येकी ६०० (किंवा ४००) रुपये भरावे लागतील. तुमचे नाव एकापेक्षा जास्त अभ्यासक्रमांच्या गुणवत्ता यादीत आले तरी **प्रवेश कोणत्यातरी एकाच अभ्यासक्रमाला घेता येईल**. इतर अभ्यासक्रमांच्या अर्जाचे शुल्क परत मिळणार नाही.
9. जर Level 1च्या एखाद्या अभ्यासक्रमाला खूप जास्त अर्ज आले तर आम्ही तुम्हाला जिथे जागा असेल अशा दुसऱ्या एखाद्या भाषेचा पर्याय देऊ. त्यासाठी वेगळे अर्जाचे शुल्क भरावे लागणार नाही. अर्ज भरताना पर्यायी भाषा जरूर निवडून ठेवा. त्या संबंधीची मेल तिसऱ्या गुणवत्ता यादीतही नाव न लागणाऱ्यांना पाठवण्यात येईल.
10. सर्व गुणवत्ता याद्या परकीय भाषा विभाग तसेच https://campus.unipune.ac.in/CCEP/Login.aspx आणि परकीय भाषा विभागाचे पान http://unipune.ac.in/dept/fine_arts/foreign_languages/default.htm येथे उपलब्ध होतील.